**ठळक बातम्या**

- विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून नागपुरात सुरू होणार, मुख्यमंत्र्यानी आयोजित केलेल्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार
- राज्याची आर्थिक स्थिती ओढाताणीची, मात्र दिवाळखोरीकडे वाटचाल नसल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- गोव्यात नाईट क्लबमध्ये लागलेल्या आगीमुळे मरण पावलेल्यांची संख्या २५ वर
- इंडिगो विमान सेवा कंपनीकडून आजही मुंबई आणि दिल्ली विमानतळावरून २२० पेक्षा जास्त उड्डाणं रद्द

**आणि**

- पुणे मॅरेथॉनमध्ये महिला गटात भारताची साक्षी जडिया, तर पुरुष गटात इथियोपियाचा टेरेफे हैमानोत यांनी पटकावलं विजेतेपद

**<><><><><>**

राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून नागपूर इथं सुरू होत आहे. त्याबाबत ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून..

**होल्ड - व्हॉईसकास्ट- अधिवेशन (कौस्तुभ)**

*(विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी अधिवेशनाच्या तयारीचा आढावा घेतला. अत्यावश्यक सुविधा, निवारा, पार्किंग, सुरक्षा व्यवस्था वायफाय, टपाल तसंच आहार याबाबत प्रशासनानं उत्तम पद्धतीनं नियोजन केलं असल्याचं त्यांनी नागपूर इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमधे विरोधी पक्षनेतेपदाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचं वार्ताहरांच्या प्रश्नाला उत्तर देताना शिंदे यांनी सांगितलं. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे देखील यावेळी उपस्थित होत्या.*

*अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांनी आयोजित केलेल्या चहापानावर विरोधी महाविकास आघाडीनं बहिष्कार टाकला. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अनिल देशमुख, आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव यांनी आज वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. सरकारनं विरोधी पक्षनेतेपद रिक्त ठेवून चहापानाला बोलावणं, तसंच शेतकरी विरोधक असलेल्या सरकारच्या चहापानाला जाणं योग्य वाटत नसल्यानं बहिष्काराचा निर्णय घेतल्याचं वडेट्टीवार यांनी सांगितलं. कापसावरचा आयातकर ११ टक्क्यावरून शून्य टक्के केल्यानं राज्यातला कापूस उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे, सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडलं आहे, राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत, देशातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपैकी ३८ टक्क्यांपेक्षा जास्त शेतकरी राज्यातले आहेत, अशी टीका त्यांनी केली. राज्याची तिजोरी रिकामी झाली आहे, ९ लाख कोटींपेक्षा जास्त कर्ज झालं आहे, निधी वाटपात भेदभाव असून लहान शहरांकडे दुर्लक्ष केलं जात आहे, कमिशनसाठी निधी वाटप होतो आहे, असे आरोप त्यांनी केले.*

*तर राज्यात अल्पवयीन मुली असुरक्षीत आहेत, कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली आहे, महार वतनाची जमीन नियमबाह्य पद्धतीनं खरेदी केल्याप्रकरणी जमीन विकत घेणाऱ्यांविरोधात कारवाई होत नाही, अशी टीका भास्कर जाधव यांनी केली.)*

**<><><><><>**

राज्याची आर्थिक स्थिती ओढाताणीची असली, तरी राज्य दिवाळखोरीकडे चाललेलं नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपूरच्या रामगिरी बंगल्यावर झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. विरोधकांनी परंपरा पाळत चहापानावर बहिष्कार टाकला. त्यांची पत्रकार परिषद निराशेनं भरलेली आणि त्रागा करणारी होती, अशी टीका

त्यांनी केली. राज्यातल्या जवळपास ९० टक्के पूरस्थितीबाधित शेतकऱ्यांना मदतीची रक्कम पोहोचली असल्याचा दावा करून, शेतकऱ्यांना मदत न मिळाल्याचं विरोधकांचं विधान अभ्यास न करता केलेलं आहे, असं फडनवीस म्हणाले. या सगळ्या विषयांवर अधिवेशनात चर्चा करायला सरकार तयार आहोत, विरोधकांच्या प्रश्नाला समर्पक उत्तर देऊ, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

**<><><><><>**

वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला दीडशे वर्षं झाल्यानिमित्त उद्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेत या गीतावर चर्चा होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या चर्चेला सुरुवात करणार आहेत. दुपारी बारा वाजता चर्चेला सुरुवात होणार आहे. त्याचप्रमाणे निवडणूक सुधारणा या विषयावर ९ डिसेंबरला चर्चा होणार असल्याचं सर्वपक्षीय बैठकीत निश्चित झालं आहे.

**<><><><><>**

आज सशस्त्र सेना ध्वज दिन आहे. देशाचं संरक्षण करणाऱ्या जवानांचा आणि शहिदांचा सन्मान करण्यासाठी १९४९ पासून, ७ डिसेंबर हा दिवस सशस्त्र सेना ध्वज दिन म्हणून पाळला जातो. या दिनानिमित्त उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज सशस्त्र सेना ध्वज दिन निधीसाठी त्यांचं एका महिन्याचं वेतन दान केलं. सर्व नागरिकांनी सशस्त्र सेना ध्वज दिन निधीत स्वेच्छेने योगदान देऊन देशाचे सैनिक, शहीद आणि त्यांच्या कुटुंबियांबद्दल कृतज्ञता व्यक्त करायचं आवाहन उपराष्ट्रपतींनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात केलं आहे.

**<><><><><>**

सामाजिक न्यायाबाबतच्या अनेक तरतुदींचा समावेश डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांमुळे राज्यघटनेत झाला, याचा फायदा अनेकांना झाला. मात्र अजूनही देशात सामाजिक समानता प्रस्थापित झालेली नाही, असं प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती अभय ठिपसे यांनी केलं आहे. ते आज

रत्नागिरीत संविधान जागर मंचातर्फे आयोजित व्याख्यानमालेत बोलत होते. भारताला हिंदूराष्ट्र म्हणणं ही राज्यघटनेतल्या तत्त्वांची पायमल्ली असून यामुळे देशाचा प्रवास उलट्या दिशेने सुरू झाल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं. डॉ नरेंद्र जाधव यांनी या कार्यक्रमाचं अध्यक्षपद भूषवलं.

**<><><><><>**

गोव्यात आरपोरा इथल्या एका नाईट क्लबमध्ये काल रात्री लागलेल्या आगीमुळे मरण पावलेल्यांची संख्या २५ वर पोहोचली आहे. मृतांमध्ये चार पर्यटकांसह बहुतांश क्लबच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. ही आग गॅस सिलिंडर स्फोटामुळे लागल्याचा पार्थमिक अंदाज आहे. या क्लबमध्ये अग्निसुरक्षा नियमांचं पालन केलं गेलं नसल्याचंही वृत्त आहे. आग लागलेल्या ठिकाणावरून सर्व मृतदेह बाहेर काढले असून, पोलीस पुढचा तपास करत आहे.

या क्लबला योग्य तपासणी न करता परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांसह, प्रत्येक जबाबदार व्यक्तीविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असं गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी म्हटलं आहे. दरम्यान राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री, गृहमंत्री आणि संरक्षण मंत्र्यांसह अनेकांनी या दुर्घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदतही जाहीर केली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही या घटनेतल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. स्थानिक प्रशासन मदत बचाव आणि मदत कार्य करत असून, पिडीतांना शक्य ते सर्व सहकार्य पुरवलं जात असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

इंडिगो विमानांच्या उड्डाणांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर आज मुंबई आणि दिल्ली विमानतळावरून २२०पेक्षा जास्त उड्डाणं रद्द केली आहेत. मात्र, लवकरच आपली सेवा पूर्ववत करायचे प्रयत्न सुरू असून पंधराशेहून जास्त उड्डाणं चालवायचं आश्वासन इंडिगोनं आपल्या निवेदनात दिलं आहे.

गेल्या काही दिवसांपासून विमान उड्डाणांवर झालेल्या परिणामामुळे भारतीय रेल्वेनं आपल्या विविध विभागांमध्ये पुढच्या दोन दिवसांसाठी ८९ विशेष गाड्या सोडायची घोषणा केली आहे. मध्य रेल्वे विभागात पुणे ते बंगळुरू, पुणे ते दिल्ली, आणि मुंबई ते दिल्ली, यासह विविध मार्गांवर १४ विशेष गाड्या, पश्चिम रेल्वे विभागात भिवानी ते मुंबई, आणि मुंबई ते शकुरबस्ती, अशा विविध मार्गांवर ७ विशेष गाड्या सोडल्या जाणार आहेत. दक्षिण मध्य रेल्वे विभागात चेरलापल्ली ते शालीमार, सिंकदराबाद ते चेन्नई- एगमोर, आणि हैदराबाद ते मुंबई, अशा ३ विशेष गाड्या चालवल्या जातील.

**<><><><><>**

पुणे मॅरेथॉनमध्ये पूर्ण मॅरेथॉन महिला गटात भारताची साक्षी जडिया हिनं विजेतेपद पटकावलं. आज झालेल्या या स्पर्धेत तिनं २ तास, ३९ मिनिटं आणि ३७ सेकंद इतक्या वेळेत ही शर्यत पूर्ण केली. दुसरा आणि तिसरा क्रमांक इथियोपियाच्या धावपटूंनी पटकावला.

पूर्ण मॅरेथॉनच्या पुरुष गटात इथियोपियाचा टेरेफे हैमानोत यानं २ तास, २० मिनिटं, ८ सेकंदांत शर्यत पूर्ण करून जेतेपद मिळवलं. दुसरा क्रमांक इथियोपियाच्या धावपटूनं मिळवला, तर भारताचा त्रिथा पुन तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

अर्ध मॅरेथॉनमध्ये पुरुष गटात भारताचा सचिन यादव यानं पहिला, राज तिवारी यानं दुसरा आणि मुकेश कुमार यानं तिसरा क्रमांक मिळवला, तर

महिलांच्या अर्ध मॅरेथॉनमध्ये भारती हिनं पहिलं आणि रविना गायकवाड हिनं दुसरं स्थान मिळवलं. याशिवाय, १० किलोमीटर, ५ किलोमीटर आणि व्हिलचेअर स्पर्धाही उत्साहात पार पडली.

**<><><><><>**

एफआयएच हॉकी पुरुष कनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत आज भारताचा सामना गतविजेत्या जर्मनीशी होणार आहे. चेन्नईच्या मेयर राधाकृष्णन स्टेडियमवर संध्याकाळी ८ वाजता सामन्याला सुरुवात होईल. भारतानं उपान्त्यपूर्व फेरीत पेनल्टी शूटआऊटमध्ये बेल्जियमवर मात केली होती.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भात अनेक ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान गोंदिया इथं ८ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात विदर्भात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.